# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर -४१६ ००४

परिपत्रक क्रमांक कोविमं/ १२ वी प्रात्यक्षिक/ तोंडी परीक्षा/ सप्टें/ऑक्टों - २०२१/1087/दिनांक ०९/०९/२०२१

**विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा सप्टेंबर/आक्टोंबर २०२१ शास्त्र, तांत्रिक, व्यवसायिक व किमान कौशल्यावर आधारित विषयांच्या प्रात्यक्षिक/तोंडी परिक्षेबाबत.**

या विभागीय मंडळाच्या कक्षेत येणाऱ्या सर्व कनिष्ठ महाविद्यालयाना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, सप्टेंबर/आक्टोबर २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या शास्त्र, तांत्रिक, व्यवसायिक व किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा तसेच भाषा आणि कला व वाणिज्य शाखेच्या विषयांच्या तोंडी परीक्षा **बुधवार दि. १५/०९/२०२१ ते सोमवार दि. ०४/१०/२०२१** या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत. याची कनिष्ठ महाविद्यालयातील प्रमुखांनी नोंद घ्यावी व या तारखा विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

**१) शास्त्र व गणित प्रात्यक्षिक परीक्षा -**

शास्त्र व गणित विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा प्रती वर्षाप्रमाणे निर्धारित केलेल्या केंद्रावर आयोजित केली जाणार आहे. अशा केंद्राची माहिती प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षा साहित्य वाटपासोबत देण्यात येईल, हे केंद्र विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन केंद्राशी संपर्क साधून प्रात्यक्षिक परीक्षेची तारीख व वेळ जाणून घेण्याबाबत विद्यार्थ्यास कळविण्यात यावे.

**२) भाषा व कला - वाणिज्य विषयाच्या तोंडी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा -**

भाषा व कला विषयाच्या तोंडी परीक्षा वरील कालावधीमध्ये आपल्या कनिष्ठ महाविद्यालयांत आयोजित कराव्यात व ज्या विषयासाठी प्रकल्प अहवाल व जर्नल/ सेमिनार नुसार गुण देण्याचे आहेत. या कालावधीतच विद्यार्थ्यांकडुन प्रकल्प व जर्नल/सेमिनार अहवाल घेऊन गुणदान करण्यात यावे जे विद्याथी पर्यावरण विषयास अनुत्तीर्ण आहेत त्यांचीही परीक्षा या कालावधीमध्ये आयोजित करुन त्याचे प्रकल्प व जर्नल सप्टेंबर/आक्टोबर २०२१ परीक्षेसाठी आपल्या स्तरावर अंतर्गत व बाहय परीक्षकांची नियुक्ती करुन परीक्षा घेऊन योग्य तपासणी करून गुणदान करण्यात यावे.

**३) एम. सी. व्ही. सी. व बायफोकल विषय प्रात्यक्षिक परीक्षा -**

एम. सी. व्ही. सी. व बायफोकल विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर आयोजित करावी त्यासाठी सप्टेंबर/आक्टोबर २०२१ परीक्षेस नियुक्त अंतर्गत व बहिस्थ परीक्षक यांचीच नियुक्ती करून सदर विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात यावी. सर्व प्रार्चायांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त प्रात्यक्षिक परीक्षेच्या कालावधीत महाविद्यालयीन अथवा अन्य प्रात्यक्षिक परीक्षेचे आयोजन न करता केवळ उच्च माध्यमिक परीक्षेसाठी प्रयोगशाळा व कर्मचारी वर्ग उपलब्ध होईल याची खातर जमा करावी. या प्रमाणे प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेचे आयोजन करावे. **परीक्षेचा कालावधी कमी असल्याने या वेळी प्रात्यक्षिक , तोंडी व श्रेणी परीक्षा Out of Turn ने आयोजित करता येणार नाही याची नोंद घ्यावी.** परीक्षा संपल्यानंतर परीक्षेचे साहित्य खालीलप्रमाणे पाकिटांमध्ये सीलबंद करुन मंगळवार दि. **०५/१०/२०२१** रोजी १० ते ४ या वेळेत जमा करावे.

**खालील दर्शविल्याप्रमाणे पाकिटे वितरण केंद्रावर जमा करावीत-**

१) प्रात्यक्षिक उत्तरपत्रिका पाकिटे.
२) तोंडी/प्रकल्प/पर्यावरण विषयाचे गुणपत्रिका पाकिटे.
३) प्रात्यक्षिक परीक्षांचे गुणतक्ते पाकिटे.
४) एम.सी.व्ही.सी. तोंडी/पर्यावरण/प्रात्यक्षिक गुणतक्ते पाकिटे. (एम.सी.व्ही.सी. विभागाकडील)
५) देयकांची पाकिटे . ६) ग्रेडलिस्ट पाकिटे.

**महत्वाचे - सप्टेंबर/आक्टोबर २०२१ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस जे पुनर्परीक्षार्थी प्रविष्ठ होणार आहेत त्या सर्व विद्यार्थ्यांना ते प्रविष्ठ होणाऱ्या सर्व विषयांची प्रात्यक्षिक/तोंडी परीक्षा पुन:श्च देणे अनिवार्य राहील. या परीक्षेत जे श्रेणी सुधार (C.I.S.) विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होणार आहेत त्यांनी सुद्धा तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा देणे अनिवार्य आहे मात्र या विद्यार्थ्यांचे पर्यावरण विषयाचे गुण व आरोग्य शारिरीक शिक्षण या विषयाची श्रेणी मागील परीक्षेचीच कळविण्यात यावे याची नोंद घ्यावी.**

वरीलप्रमाणे परीक्षा आयोजित करुन तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा साहित्य मंडळाने कळविलेल्या तारखांना जिल्हा वाटप केंद्रावर जमा करावे.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रति,
प्राचार्य, सर्व कनिष्ठ महाविद्यालये, सातारा, सांगली व कोल्हापूर.